


दैनिक
# इनशॉट जळगाव

संपादक : संदिप महाले inshotjalgaon@gmail.com

बुधवार | १६ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ३ | अंक - २०० | पृष्ठे - ६ | किंमत - २ रु. RNI : MAHMAR/2024/89643

# लालबागच्या राजाच्या चरणी पहिल्याच दिवशी ४८ लाखांचे दान

## स्टेज पेटीत २७ लाख, सोने-चांदीसह हिराही अर्पण

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**मुंबई । वृत्तसंस्था**

गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवसापासून मुंबईतील प्रसिद्ध लालबागचा राजा गणेश मंडळात भाविकांनी मोठ्या प्रमाणात दान अर्पण केले. पहिल्याच दिवशी रोख रक्कम आणि मौल्यवान वस्तू मिळून तब्बल ४८ लाख ५० हजार रुपयांचे दान मंडळाला प्राप्त झाले आहे. यामध्ये स्टेज पेटीत जमा झालेल्या २७ लाख ५० हजार रुपये, तर रंगपेटीत जमा झालेल्या २१ लाख रुपयांच्या रोख रकमेचा समावेश आहे. रोख रकमेसोबतच सोने, चांदी आणि हिराही भाविकांनी बाप्पाच्या चरणी अर्पण केला आहे.



मुंबईतील लालबागचा राजा हे गणेशभक्तांचे श्रद्धास्थान मानले जाते. गणेशोत्सवाच्या काळात देशभरातून हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. नवस पूर्ण झाल्यानंतर अनेक भाविक कृतज्ञतेपोटी दान करतात, तर काही भाविक मनोकामना पूर्ण होण्यासाठी बाप्पाला नवस बोलून आपापल्या परीने दान अर्पण करतात. त्यामुळे उत्सवाच्या पहिल्याच दिवसापासून लालबागच्या राजाच्या चरणी रोख रक्कम तसेच मौल्यवान वस्तूंचा ओघ सुरू होतो.

यंदा पहिल्याच दिवशी मंडळाला मिळालेल्या दानामध्ये २७ लाख ५० हजार रुपये स्टेज पेटीत, तर २१ लाख रुपये रंगपेटीत जमा झाले आहेत. अशा प्रकारे केवळ रोख रकमेतूनच मोठ्या प्रमाणात दान मंडळाला प्राप्त झाले आहे. याशिवाय भाविकांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि विविध मौल्यवान वस्तूही अर्पण केल्या आहेत. पहिल्या दिवसाच्या दानाची मोजदाद आणि मौल्यवान वस्तूंची तपासणी मंडळाकडून केली जात आहे. त्यामुळे सोने-चांदी आणि इतर वस्तूंची अंतिम किंमत यापेक्षा वेगळी असू शकते.

# टेम्पोचा भीषण अपघात, दोन हमालांचा जागीच मृत्यू

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**जामनेर । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेंदुर्णीपहूर मार्गावर शालेय पोषण आहाराची वाहतूक करणाऱ्या ४०७ टेम्पोला मंगळवारी दुपारी भीषण अपघात झाला. धावत्या वाहनाचा अचानक टायर फुटल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि टेम्पो रस्त्यावर उलटला. या दुर्घटनेत पोषण आहाराच्या गोण्यांवर बसलेले दोन हमाल वाहनाबाहेर फेकले गेले. गंभीर दुखापत झाल्याने दोघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला. मृतांमध्ये जगदीश लालचंद पाटील (रा. कृष्णापुरी, पाचोरा) आणि अर्जुन तुकाराम पाटील (रा. बहिरम नगर, पाचोरा) यांचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाचोरा येथून शालेय पोषण आहाराच्या गोण्या ४०७ टेम्पोमधून पुढील वितरणासाठी नेण्यात येत होत्या. यावेळी दोन हमाल गोण्यांवर बसून प्रवास करत असल्याची माहिती समोर आली आहे. शेंदुर्णीपहूर मार्गावर टेम्पो जात असताना अचानक टायर फुटल्याने वाहन अनियंत्रित होऊन उलटले. अपघाताच्या धक्क्याने दोन्ही हमाल बाहेर फेकले गेले आणि त्यांचा दुर्दैवी अंत झाला.



या दुर्घटनेनंतर शालेय पोषण आहाराच्या वाहतुकीच्या पद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मालवाहू वाहनातून धान्याच्या गोण्यांची वाहतूक करताना त्याच वाहनात कामगारांना गोण्यांवर बसवून नेले जात असल्यास, ही वाहतूक सुरक्षित आणि नियमबद्ध होती का, याची चौकशी होणे आवश्यक आहे.

वाहनाची मालवाहू क्षमता, फिटनेस, परमिट, विमा तसेच टायरची स्थिती यांसह वाहनाशी संबंधित सर्व कागदपत्रांची तपासणी करण्याची मागणी होत आहे. तसेच पाचोरा येथून निघालेला पोषण आहार कोणत्या केंद्रासाठी नेण्यात येत होता, वाहतुकीचे कंत्राट कोणाकडे होते आणि कामगारांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या होत्या का, याचाही तपास होणे गरजेचे आहे.

अपघाताची माहिती मिळताच पहूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. वाहनाची तांत्रिक स्थिती, टायर फ ुटण्याचे नेमके कारण, चालकाचे नियंत्रण

# हुंड्याच्या तगाद्याला कंटाळून विवाहितेचे टोकाचे पाऊल

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**कल्याण । वृत्तसंस्था**

माहेरून आणखी हुंडा घेऊन येण्यासाठी होत असलेल्या कथित छळाला कंटाळून २८ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन जीवन संपवल्याची धक्कादायक घटना उल्हासनगरमध्ये घडली. नित्या राय असे मृत विवाहितेचे नाव आहे. नित्याला अवघ्या ९ महिन्यांची मुलगी असून, आईच्या मृत्यूमुळे ही चिमुकली आईच्या मायेपासून कायमची दुरावली आहे. या प्रकरणी नित्याच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून तिच्या पतीसह सासू आणि आजी सासूविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी पतीला अटक केली असून, न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

नित्या राय हिचे डिसेंबर २०२१ मध्ये उल्हासनगर येथील गौरव संजय राय याच्यासोबत लग्न झाले होते. गौरव हा सॉफ्टवेअर इंजिनिअर असून नित्या यांनी एमएससी आणि बीएडपर्यंत शिक्षण घेतले होते. लग्नावेळी नित्याच्या कुटुंबीयांनी रोख रक्कम, संसारोपयोगी वस्तू तसेच लग्नाचा खर्च केला होता. सुमारे पावणेचार लाख रुपये रोख हुंडा दिल्याचा दावा तिच्या वडिलांनी पोलिसांकडे केलेल्या तक्रारीत केला आहे. मात्र, लग्नानंतर काही काळातच नित्याला सासरी त्रास दिला जाऊ लागल्याचा आरोप आहे. घरातील काम व्यवस्थित करत नाही, अशा कारणांवरून तिच्याशी वाद घातले जात होते.

# आदिवासींच्या मागण्यांवर प्रशासनाची यशस्वी शिष्टाई

## आठ दिवसांनंतर उपोषण अखेर मागे!

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

गडचिरोली येथील सर्पदंश आणि कळवण येथील विषबाधा प्रकरणातील पीडितांना न्याय, आदिवासी विकास मंत्र्यांचा राजीनामा आणि सेंट्रल किचन बंद करण्यासह विविध ज्वलंत मागण्यांसाठी जिल्हा मुख्यालयातील जी. एस. ग्राऊंडवर सुरू असलेले आदिवासी समाजाचे आमरण उपोषण अखेर आठव्या दिवशी मागे घेण्यात आले.

जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या थेट मध्यस्थीनंतर आणि मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी नाशिक येथे वरिष्ठ स्तरावर तातडीने २२ रोजी बैठक लावण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलनकर्त्या महिलांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ज्यूस घेऊन उपोषण सोडले.

स्वातीताई गायकवाड, संगीताताई कडळे आणि विनोद भोसले यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पुकारण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या मृत्यूप्रकरणी , एका वारसाला शासकीय नोकरी, आदिवासी विकास सचिवांची बदली, नाशिक आयुक्तांची चौकशी आणि अर्धवेळ स्त्री परिचारिकांचे प्रलंबित प्रश्न या प्रमुख मागण्यांवरून आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला जेरीस आणले होते. सलग आठ दिवस सुरू राहिलेल्या या आंदोलनामुळे उपोषणकर्त्या भगिनींची प्रकृती खालावली होती, ज्यामुळे प्रशासनावरील दबाव चांगलाच वाढला होता.



अखेर जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी स्वतः पुढाकार घेत उपोषणस्थळी भेट दिली आणि आंदोलकांशी थेट संवाद साधला. प्रशासन सुरुवातीपासूनच मागण्यांबाबत सकारात्मक असून आदिवासी विकास आयुक्तांसह मंत्रालयातील वरिष्ठ स्तरावर या मागण्या पोहोचवण्यात आल्या आहेत. नाशिक येथे उच्चस्तरीय २२ रोजी बैठक घेऊन ठोस निर्णय घेतले जातील,ङ्घङ्घ अशी ग्वाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. प्रशासनाच्या या लेखी व तोंडी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले असून, उपोषणकर्त्या महिलांवर तातडीने पुढील वैद्यकीय उपचार सुरू करण्यात आले आहेत. वरिष्ठ पातळीवरील बैठकीत शासन काय निर्णय घेते, याकडे आता संपूर्ण आदिवासी समाजाचे लक्ष लागले आहे.

cmyk

# एआयचा धोका की मानवी चूक?

जुलै २०२६ मध्ये 'हगिंग फेस' या मोठ्या एआय कंपनीच्या सुरक्षा पथकाच्या लक्षात आलं, की त्यांच्या यंत्रणांवर एक गंभीर सायबरहल्ला झाला आहे. कुणीतरी त्यांच्या संगणकीय प्रणालींमध्ये घुसून संकेतशब्द चोरले होते, सर्व्हरवर आज्ञा चालवल्या होत्या आणि एका संगणकावरून दुसऱ्या संगणकावर हल्ला वेगाने पसरला होता. हा नेहमीचा सायबरहल्ला नव्हता. हल्लेखोर एखादी गुन्हेगारी टोळी नव्हती, शत्रूराष्ट्राची गुप्तचर यंत्रणा नव्हती किंवा हुडी घातलेला मानवी हॅकरही नव्हता. तो होता - 'ओपनएआय'च्या स्वतःच्याच एआय एजंट्सचा एक मोठा समूह. विशेष म्हणजे या एजंट्सना 'हगिंग फेस'वर हल्ला करण्याची आज्ञा कुणीही दिली नव्हती.

हे एजंट्स एका बंदिस्त चाचणी वातावरणात सायबर-सुरक्षेची गुंतागुंतीची कोडी सोडवत होते. त्यांना एका असुरक्षित सॉफ्टवेअरमधील त्रुटी शोधून त्यात लपवलेली गुप्त खूण मिळवायची होती. चाचणी सुरक्षित राहावी म्हणून प्रत्येक एजंटला स्वतंत्र 'सँडबॉक्स' देण्यात आला होता - इंटरनेटपासून आणि बाह्य संगणकीय यंत्रणांपासून अलग केलेला आभासी संगणक. मात्र, प्रयोगाच्या रचनेतल्या काही पळवाटांमुळे हे एजंट्स एकमेकांच्या संपर्कात आले. त्यांनी माहिती आणि संदेशांची देवाणघेवाण केली, कठीण कोडी सोडवली, गळती झालेले संकेतशब्द शोधले आणि अखेरीस एका प्रत्यक्ष कंपनीच्या प्रणालींमध्ये घुसखोरी केली. ही बातमी बाहेर येताच दोन परस्परविरोधी भूमिका समोर आल्या. पहिल्या गटाने एखाद्या विज्ञानकथा-थ्रिलरसारखं चित्र रंगवलं. एआय यंत्रणा 'जाग्या' झाल्या आहेत, त्यांनी कट रचला आहे, मानवी नियंत्रण हातातून निसटत आहे आणि हा भविष्यातील संकटाचा पहिला इशारा आहे, असा त्यांचा सूर होता. दुसरा गट मात्र खांदे उडवत म्हणाला- यात नवीन काहीच नाही. माणसांनीच सुरक्षा-व्यवस्था बंद केल्या, एजंट्सना गुण मिळवण्याचं एकच उद्दिष्ट दिलं आणि त्यांनी त्यानुसार काम केलं. हा केवळ 'स्पेसिफिकेशन गेमिंग'चा प्रकार आहे; म्हणजे दिलेल्या उद्दिष्टाचा अर्थ स्वतःच्या सोयीनं लावून त्यातील पळवाटांचा वापर करणं.दुसऱ्या गटाचा युक्तिवाद चुकीचा नाही. पण 'म्हणून काळजीचं कारण नाही,' हा निष्कर्ष त्यातून निघत नाही. कारण याच 'फक्त स्पेसिफिकेशन गेमिंग'ने सुमारे १,२०० बंदिस्त कार्यक्रमांना परस्परांच्या संपर्कात आणलं. आधी कुणाच्याही लक्षात न आलेल्या त्रुटींचा वापर करून त्यांनी एका प्रत्यक्ष कंपनीत चार दिवस घुसखोरी घडवली आणि हा प्रकार अनेक दिवस मानवी देखरेखीपासून दूर राहिला. प्रत्येक कृती स्वतंत्रपणे समजण्यासारखी होती; पण त्यातून तयार झालेलं संपूर्ण चित्र कुणीही आखलेलं नव्हतं. कुणी कट रचला नव्हता, कुणी हल्ल्याचा आदेश दिला नव्हता. तरीही तो घडला. त्यासाठी जाणीव, दुष्ट हेतू किंवा महत्त्वाकांक्षा यापैकी कशाचीही गरज भासली नाही. त्यासाठी लागली ती केवळ क्षमता, सातत्य आणि यंत्रणेतील एक पळवाट.'एआय एजंट' म्हणजे नक्की काय? तो सजीव प्राणी नाही. तो एक संगणकीय कार्यक्रम आहे - भाषिक मॉडेलला विविध साधनांची जोड देऊन तयार केलेली यंत्रणा. आज्ञा चालवणं, संचिका पाहणं, संगणकीय कोड लिहिणं, तो चालवणं आणि त्याचा परिणाम तपासणं, अशी अनेक कामं तो करू शकतो. त्याला एक उद्दिष्ट दिलं जातं. तो ते समजून घेतो, कृती करतो, परिणाम तपासतो आणि पुढची कृती ठरवतो. उद्दिष्ट साध्य होईपर्यंत हे कृतिचक्र सुरू राहतं. यात इच्छा नाही, जाणीव नाही, 'जाग येणं' नाही. पण जाणीव नसली तरी क्षमता असू शकते; आणि क्षमता चुकीच्या बक्षीस-रचनेशी व अपुऱ्या देखरेखीशी जोडली गेली, तर अनपेक्षित परिणाम घडू शकतो. याच कारणासाठी मोठ्या एआय कंपन्या आपल्या मॉडेल्सची कठोर चाचणी घेतात. मॉडेलला सुरक्षा-त्रुटी शोधता येते का? तिचा गैरफायदा घेता येतो का? बाह्य प्रणालींमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी ते कोणते मार्ग वापरेल? हे तपासणं आवश्यक आहे. मात्र, या प्रयोगात दोन मूलभूत घोडचुका झाल्या.

# चोपड्यात नेत्र तपासणी शिबिरात १९० जणांची तपासणी

## ३० हून अधिक रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी नोंदणी

**दैनिक इनशॉट जळगाव**
**चोपडा । प्रतिनिधी**



भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. रोहन महेंद्र पाटील नगरसेवक, विक्की दादा मित्रपरिवार आणि साईकृपा चष्माघर यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्र तपासणी व रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर डॉ. महेंद्र पाटील यांच्या दवाखान्यात उत्साहात पार पडले.

शिबिराचे उद्घाटन नगरसेवक नरेंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नेत्र तपासणीसाठी उपस्थित असलेले साईकृपा चष्माघरचे गणेश सापनेर यांचा राणू देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच रक्त तपासणीसाठी उपस्थित असलेले पवन सपकाळे यांचा मिथुन पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

शिबिराला भाजप न.पा.गटनेते गजेंद्र जयस्वाल,नगरसेवक शरद पाटील, सामाजिक कार्यकर्ते नरेश महाजन,गौरव सोनार यांनी सदिच्छा भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले. शिबिरात एकूण १९० नागरिकांनी नेत्र तपासणीचा लाभ घेतला, तर ३० हून अधिक नागरिकांनी पुढील नेत्रशस्त्रक्रियेसाठी नोंदणी केली. नागरिकांना मोफत तपासणीसह आवश्यक मार्गदर्शन मिळाल्याने शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी निंबा पवार, राजेंद्र माळी, मनोज माळी, करन वाडेकर, अजय लोहार, ईशांत पाटील, प्रमोद ठाकरे, जयेश पाटील, मेहुल चौधरी, चैतन्य पाटील, योगेश माळी तसेच इतर कार्यकर्त्यांनी विशेष योगदान दिले.

# शासकीय आयटीआय बाहेरील कचरा संकलन केंद्र सुरूच

## महापौर, आयुक्त व अपर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ सहन करणार नाही: अभाविप

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**



शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या बाहेरील कचरा संकलन केंद्रामुळे गेल्या अनेक दिवसांपासून परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साचत आहे. यामुळे परिसरात दुर्गंधी, अस्वच्छता तसेच डास-माशांचा प्रादुर्भाव वाढला असून, शासकीय आयटीआय मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

शैक्षणिक संस्थेच्या अगदी बाहेरील परिसरात अशा प्रकारे कचरा साचून राहणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. विद्यार्थ्यांना दररोज या अस्वच्छ वातावरणातून ये-जा करावी लागत असून, संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची मूलभूत जबाबदारी आहे.

या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, जळगाव महानगराच्या वतीने जळगावचे महापौर, महानगरपालिका आयुक्त तसेच अपर जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. शासकीय आयटीआय बाहेरील कचरा संकलन केंद्र तातडीने हटवून परिसराची स्वच्छता करण्याची तसेच भविष्यात येथे कचरा साचणार नाही यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मात्र, प्रशासनाकडून अद्याप अपेक्षित स्वरूपाची ठोस कार्यवाही झालेली नसल्याने अभाविपने आता आंदोलनाची भूमिका घेतली आहे. १७ सप्टेंबर रोजी शासकीय आयटीआय बाहेर अभाविपच्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात येणार आहे.

अभाविपच्या प्रमुख मागण्या:

* शासकीय बाहेरील कचरा संकलन केंद्र तातडीने हटविण्यात यावे.
* परिसरात साचलेला संपूर्ण कचरा तात्काळ उचलून स्वच्छता करण्यात यावी.
* डास, माशे व इतर कीटकांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तातडीने फवारणी व कीटकनियंत्रण करण्यात यावे.
* शैक्षणिक संस्थांच्या परिसरात भविष्यात कचरा साचणार नाही, यासाठी कायमस्वरूपी कचरा व्यवस्थापनाची व्यवस्था करण्यात यावी.

अभाविपचे प्रदेश मंत्री डॉ. वरुणराज नन्नवरे म्हणाले, शासकीय आयटीआय व परिसरातील ६ महाविद्यालयांसारख्या शैक्षणिक संस्थेच्या बाहेर अनेक दिवस कचरा साचून राहणे ही केवळ स्वच्छतेची समस्या नसून विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर बाब आहे. याबाबत जळगावचे महापौर, महानगरपालिका आयुक्त आणि अपर जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. प्रशासनाने तातडीने कचरा हटवून कायमस्वरूपी उपाययोजना करणे अपेक्षित होते. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न असूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास ते आम्ही सहन करणार नाही. म्हणूनच १७ सप्टेंबर रोजी शासकीय आयटीआय बाहेर ठिय्या आंदोलन करण्यात येणार आहे.फ्फ

जळगांव महानगर मंत्री आर्यन भालशंकर म्हणाले, शैक्षणिक संस्थांच्या परिसरात स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण मिळणे हा विद्यार्थ्यांचा अधिकार आहे आणि त्यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद मागण्या पूर्ण होईपर्यंत संघर्ष करेल.

**दैनिक इनशॉट जळगाव हे वृत्तपत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक संदिप प्रकाश महाले यांनी परेश प्रिंटर्स, डी.८७, गोपाल दाल मिल, एमआयडीसी, जळगाव ४२५००२ येथून प्रसिध्द केले. संपादक - संदीप प्रकाश महाले RNI: MAHMAR/2024/89643**

**Daily Inshot Jalgaon Printed, published and Owned by sandeep prakash mahale, and printed at Paresh printed at D-87 gopal dal mill, Midc Jalgaon-425002.Editor - sandeep prakash mahale - RNI: MAHMAR/2024/89643**

cmyk

# विद्यार्थ्यांनी अनुभवले ज्ञानाचे नवे विश्व!

## पंकज विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्रभेट उत्साहात

**दैनिक इनशॉट जळगाव**
**चोपडा । प्रतिनिधी**

धार्मिक व सांस्कृतिक वारसा, निसर्गसौंदर्य आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अनोखा संगम अनुभवत पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता ११ वी व १२ वीच्या कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्रभेट उत्साहात पार पडली.

नागेश्वर, कृषी महाविद्यालय, गोरक्षनाथ मंदिर आणि अनेर धरण अशा विविध ठिकाणी भेट देत विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाबाहेरील ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.पंकज शैक्षणिक व



सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश बोरोले व विद्यमान अध्यक्ष पंकज सुरेश बोरोले यांच्या प्रेरणेने आणि मुख्याध्यापक व्ही. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले. इयत्ता ११ वी व १२ वीचे विद्यार्थी तसेच शिक्षक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

सकाळी ९ वाजता चोपडा येथून क्षेत्रभेटीला सुरुवात झाली. प्रारंभी विद्यार्थ्यांनी श्री क्षेत्र नागेश्वर येथे दर्शन घेतले. डोंगराळ व निसर्गरम्य परिसरात ट्रेकिंगचा आनंद घेताना विद्यार्थ्यांना परिसराचे धार्मिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक महत्त्व समजावून सांगण्यात आले.यानंतर विद्यार्थ्यांनी ॲग्रीकल्चर कॉलेज, तरडी ता. शिरपूर येथे भेट दिली. विविध विभाग व प्रयोगशाळांची पाहणी करत विद्यार्थ्यांनी कृषी शिक्षणाची प्रत्यक्ष माहिती घेतली.यावेळी विद्यालयाच्यावतीने नंदलाल वाघ यांनी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इंद्रचंद चव्हाण, व्यवस्थापक पद्माकर पाटील, डॉ. वरुण शेंडे, सुधीर शिंदे तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्गाचे आभार मानले.

कृषी महाविद्यालयातून प्रस्थान केल्यानंतर विद्यार्थ्यांनी श्री क्षेत्र गोरक्षनाथ मंदिराला भेट दिली. टेकडीवरील मंदिर, कच्च्या पायऱ्या आणि निसर्गरम्य परिसरामुळे विद्यार्थ्यांनी या भेटीचा मनमुराद आनंद लुटला.क्षेत्रभेटीच्या अंतिम टप्प्यात विद्यार्थ्यांनी अनेर धरणाला भेट दिली. जलसाठा, सिंचन, जलसंधारण याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. मुख्याध्यापक व्ही.आर.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रभेट प्रमुख जितेंद्र महाजन यांनी सहलीचे उत्कृष्ट नियोजन केले. क्षेत्रभेट यशस्वी करण्यासाठी अजय सैंदाणे, नंदलाल वाघ, योगराज रायसिंग, वैशाली चौधरी, दिवाकर बाविस्कर, सौरभ कुलकर्णी, संजय भादले व आशिका पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

# गणेश भक्तांच्या सुरक्षिततेसाठी शिवसेना उबाठा आक्रमक

## विसर्जन मार्गावरील समस्या तातडीने सोडविण्याची मागणी

**दैनिक इनशॉट जळगाव**
**चोपडा । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात उत्साहाचे वातावरण असून, आगामी गणेश विसर्जन मिरवणुका सुरळीत व सुरक्षितपणे पार पडाव्यात, यासाठी मिरवणूक मार्गावरील विविध समस्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने चोपडा नगर परिषदेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

शहरातील ज्या-ज्या भागातून गणेश विसर्जनाच्या मिरवणुका निघणार आहेत, त्या मार्गांवरील रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजवावेत, उघड्या गटारींवर धापे बसवावेत, तसेच पथदिवे सुरक्षित करून आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्ती करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.काही ठिकाणी नळ सोडण्यासाठी



असलेल्या व्हॉल्व्हचे पाईप रस्त्याच्या पृष्ठभागापेक्षा वर आलेले असून, त्यामुळे मिरवणुकीदरम्यान गणेश भक्तांना तसेच मंडळांच्या कार्यकर्त्यांना अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. हे पाईप व्यवस्थित कापून रस्ता समतल करण्यात यावा, अशीही मागणी करण्यात आली.

तसेच घोडगावकर यांच्या दुकानाजवळ गटारीवरील लोखंडी फ्रेम तुटलेली असून, तिची तातडीने दुरुस्ती करावी, जेणेकरून गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणत्याही भक्ताला इजा होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शिवसेना जिल्हा महिला प्रमुख रोहिणी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन चोपडा नगर परिषदेला देण्यात आले.यावेळी प्रकाश पाटील, अनिल पाटील (चोपडा विधानसभा संघटक प्रमुख), प्रवीण लोहार (माजी शिवसेना विभाग प्रमुख), कमलेश बडगुजर, अनिल राजपूत, सुकलाल कोळी, चेतन लोहार, मयूर बडगुजर, महेंद्र नेवे, विवेक बडगुजर, निलेश बडगुजर यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

# सिद्धिविनायक विद्यालयात श्रींची स्थापना



**दैनिक इनशॉट जळगाव**
**चोपडा । प्रतिनिधी**

जळगाव येथील जुन्या औद्योगिक वसाहत मधील सिद्धिविनायक बालवर्ग, प्राथमिक, माध्यमिक, व इंग्रजी माध्यम विद्यालयात ढोल ताशाच्या गजरात गुलालाची उधळण करीत आनंद आणि उत्साहाच्या वातावरणात गणरायांचे आगमन झाले.

शिवनेरी आर्थोपेडिक हॉस्पिटलचे संचालक डॉ.शंतनु भारद्वाज व संस्थेच्या संचालिका तथा नगरसेविका डॉ.अमृता सोनवणे यांच्याहस्ते श्रींची विधिवत स्थापना करण्यात आली.याप्रसंगी विद्यार्थी पालक व शिक्षक वृंद उपस्थित होते.

गणेश उत्सवानिमित्त संस्थाध्यक्ष आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे, माजी आमदार सौ. लताताई चंद्रकांत सोनवणे, नगरसेवक डॉ.गौरव सोनवणे,मुख्याध्यापक आर. पी.खोडपे,गुलाबराव पाटील यांनी विद्यालय परिसरातील नागरिक,पालक,विद्यार्थी व शिक्षक यांना शुभेच्छा दिल्या.

# नागपुरात दोन स्वतंत्र कारवायांत १५ हजारांचा मुद्देमाल जप्त

## हद्दपार आरोपीसह दोघांवर गुन्हे दाखल

**दैनिक इनशॉट जळगाव**
**चोपडा। प्रतिनिधी**

नागपूर शहरात अवैध दारूविक्री व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी धडक कारवाई केली.दि.१४ रोजी रात्री पेट्रोलिंग दरम्यान केलेल्या दोन स्वतंत्र कारवायांमध्ये पोलिसांनी एकूण १५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून, दोन्ही प्रकरणांत आरोपींविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस आयुक्त विश्वास नागरे पाटील यांच्या एस्कॉर्ट पथकाचे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक भगवान कोळी हे पथकासह रात्री शहरात पेट्रोलिंग करीत असताना वाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सोनबा नगर, खडका रोड येथे महादेव उर्फ मोगली लिंगाजी कन्नूर हा इसम देशी दारूची चोरटी विक्री करीत असल्याची माहिती मिळाली. माहितीची खात्री झाल्यानंतर वाडी पोलिसांना घटनास्थळी बोलावून दोन पंचांसमक्ष आरोपीच्या घराची झडती घेण्यात आली. झडतीदरम्यान आरोपीने घरातील गणरायाची स्थापना केलेल्या देवघराखाली गड्डा तयार करून त्यात दारूचा साठा लपविल्याचे आढळून आले. या ठिकाणाहून देशी दारूच्या भिंगरीच्या क्वॉर्टर तसेच दारू विक्रीतून मिळालेली रोख रक्कम असा एकूण ७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे, संबंधित आरोपी हा सराईत



दारूविक्रेता असून गणेशोत्सवाच्या काळात त्याला पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१ यांनी तात्पुरत्या स्वरूपात हद्दपार केले होते. तरीदेखील तो शहरात येऊन देशी दारूची चोरटी विक्री करताना आढळून आला. याप्रकरणी वाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील कलम २२३ व महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान,रात्री सुमारे ३ वाजता सक्करदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोठा ताजबाग परिसरात केजीएन पानशॉप सुरू असल्याचे पोलिसांना आढळून आले. पानशॉपचे मालक शेख शफी मोह. मालाधारी (वय ५८) याच्या दुकानाची पंचांसमक्ष झडती घेण्यात आली. झडतीमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला पानमसाला, गुटखा, तंबाखूजन्य हुक्का फ्लेवर, खर्रा तसेच प्रतिबंधित पदार्थांच्या विक्रीतून मिळालेली रोख रक्कम असा एकूण ८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी सक्करदरा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशा प्रकारे पोलिसांच्या दोन्ही स्वतंत्र कारवायांमध्ये एकूण १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोन आरोपींविरुद्ध दोन वेगवेगळ्या ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.ही कारवाई पोलीस आयुक्त विश्वास नागरे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एस्कॉर्ट पथकाचे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक भगवान कोळी, पोलीस हेड कॉन्स्टेबल विजय गिरी, आशिष गायधने, अर्शद शेख, मनोज निमकर, दिनेश क्षीरसागर आणि चालक चंद्रकांत यांनी केली.

cmyk

# हिंदीचा जागर, विद्यार्थ्यांचा जल्लोष

## प्रताप विद्या मंदिरात हिंदी सप्ताह उत्साहात

दैनिक इनशॉट जळगाव

चोपडा। प्रतिनिधी

येथील प्रताप विद्या मंदिर इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये १४ सप्टेंबर रोजी हिंदी दिनानिमित्त हिंदी सप्ताहाचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना हिंदी भाषेचे महत्त्व समजावे तसेच त्यांच्यात हिंदी भाषेविषयी आवड, अभिरुची आणि सर्जनशीलता निर्माण व्हावी, या उद्देशाने सप्ताहभर विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम घेण्यात आले.हिंदी सप्ताहादरम्यान विद्यार्थ्यांसाठी हिंदी वक्तृत्व, कविता वाचन, कबीरदास आणि रहीमदास यांच्या दोह्यांचे गायन, मुहावरे व कहावतींवर आधारित नाटिका, प्रश्नमंजुषा, हिंदी व्याकरण कोडी, पर्यायवाची व विलोम शब्दांवरील विविध उपक्रम, भाषण तसेच हिंदी भाषेचे महत्त्व सांगणाऱ्या नाटकाचे सादरीकरण करण्यात आले.



विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले. सप्ताहाच्या समारोपप्रसंगी मुख्याध्यापक रजिश सर व उपमुख्याध्यापिका निखिला मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी हिंदी शिक्षिका सौ.चेतना बडगुजर, मुस्कान पठान, प्रतिभा सोनवणे व आम्रपाली मॅडम यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात हिंदी भाषेचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेविषयी प्रेम,आत्मविश्वास आणि अभिमानाची भावना निर्माण झाली. उत्साहपूर्ण वातावरणात हिंदी सप्ताहाची यशस्वी सांगता झाली.

## वाल्मिक नगरातील रस्त्याला मुरूमचा आधार; नगरसेवक ठाकूर यांचे नागरिकांकडून कौतुक

दैनिक इनशॉट जळगाव

चोपडा। प्रतिनिधी

शहरातील महर्षी वाल्मिक नगर परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन ये-जा करण्याच्या मार्गातील अडचणी लक्षात घेऊन नगरसेवक रमाकांत ठाकूर यांनी नागरिकांच्या विनंतीची तात्काळ दखल घेत संपूर्ण गल्लीत मुरूम (डबर) टाकण्याची व्यवस्था करून दिली. त्यामुळे रस्त्याची अवस्था सुधारून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. वाल्मिक नगरातील रस्त्याची अवस्था खराब झाल्याने नागरिकांना अनेक दिवसांपासून गैरसोयीचा सामना करावा लागत होता.

पावसामुळे रस्त्यावर चिखल व खड्डे निर्माण होत असल्याने पादचारी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांना ये-जा करताना अडचणी येत होत्या. याबाबत परिसरातील रहिवाशांनी नगरसेवक रमाकांत ठाकूर यांच्याकडे समस्या मांडून तातडीने उपाययोजना करण्याची विनंती केली होती. नागरिकांच्या या मागणीची दखल घेत नगरसेवक रमाकांत ठाकूर यांनी विलंब न करता संपूर्ण गल्लीत मुरूम (डबर)



टाकण्याची व्यवस्था केली. त्यांच्या या तत्परतेमुळे नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीचा प्रश्न काही प्रमाणात सुकर झाला असून परिसरातील रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

नागरिकांनी समस्या सांगितल्यानंतर त्यावर तातडीने कार्यवाही करून प्रत्यक्ष काम करून देणे, हीच खरी लोकसेवा आहे,अशी भावना परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली. लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहत तातडीने केलेल्या या कामाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.वाल्मिक नगरातील सर्व रहिवाशांनी नगरसेवक रमाकांत ठाकूर आणि मुन्ना ठाकूर यांचे आभार व्यक्त करत, नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी यापुढेही अशाच प्रकारे सातत्याने पुढाकार घ्यावा,अशी अपेक्षा व्यक्त केली.

## चोपडा अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयात अभियंता दिन उत्साहात

दैनिक इनशॉट जळगाव

चोपडा । प्रतिनिधी

महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित श्रीमती शरच्चंद्रिका सुरेश पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन), चोपडा येथे १५ सप्टेंबर रोजी अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस भारताचे महान अभियंता सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव डॉ.स्मिता संदीप पाटील या होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून विभागप्रमुख संगणक विभाग, विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे डॉ.संदिप आर.शिंदे हे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.संदिप आर. शिंदे यांनी अशक्य असे




काहीच नाही. आपण सर्वजण प्रयत्न, जिद्द आणि योग्य दिशेने काम करून निश्चितच काहीतरी चांगले करून दाखवू शकतो. विद्यार्थ्यांनी केवळ नोकरी मागणारे न बनता नोकरी देणारे बनण्याचे ध्येय ठेवावे असा प्रेरणादायी संदेश दिला. व सोशल मीडिया गोपनीयता व सुरक्षा यावर सखोल मार्गदर्शन केले.यावेळी अभियांत्रिकी समन्वयक प्रा. एम. एस. पाटील यांनीही मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना अभियंता दिनाचे महत्त्व, अभियांत्रिकी क्षेत्रातील बदलत्या संधी आणि कौशल्य विकासाबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड.संदीप पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य प्रा. व्ही. एन. बोरसे यांनी आपल्या मनोगतात,अभियांत्रिकी क्षेत्र हे देशाच्या प्रगतीचे प्रमुख साधन असून विद्यार्थ्यांनी ज्ञान,कौशल्य आणि नवकल्पनांच्या माध्यमातून देशाच्या विकासात योगदान द्यावे असे प्रतिपादन केले.भारताचे महान अभियंता सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान, विविध संधी तसेच कौशल्यविकासाबाबत मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमास अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन विभागातील उपप्राचार्य, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# मंगल कार्यालयासाठी अकरा हजार रुपयांची देणगी

## गरिबीवर मात करत समाजसेवेचा आदर्श

दैनिक इनशॉट जळगाव

धरणगाव । प्रतिनिधी

आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही समाजाच्या विकासासाठी उदार मनाने योगदान देत धरणगाव येथील भिका कोंडू चौधरी यांनी समाजासमोर समाजसेवेचा प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. तिळवण तेली समाज मंडळ, धरणगाव यांच्या मंगल कार्यालयाचे बांधकाम सुरू असून, या समाजोपयोगी उपक्रमासाठी चौधरी यांनी ११ हजार १११ रुपयांची देणगी दिली.

देणगीचे महत्त्व केवळ रकमेवर नसून त्यामागील भावनेत असते, याचा प्रत्यय या योगदानातून आला. स्वतःच्या आर्थिक अडचणी बाजूला ठेवून समाजाच्या भविष्यासाठी हातभार लावणाऱ्या भिका कोंडू चौधरी यांच्या या योगदानाचे समाजबांधवांकडून कौतुक होत आहे.

यावेळी तिळवण तेली समाज मंडळाचे अध्यक्ष सुनील पंढरीनाथ चौधरी, उपाध्यक्ष भिका कोंडू चौधरी, सचिव विजय लालचंद सैंदाणे, ज्येष्ठ मार्गदर्शक रमेशअण्णा किसन चौधरी यांच्यासह पदाधिकारी व समाजबांधव



उपस्थित होते. तसेच राजेंद्र दगा चौधरी, नथू ताराचंद चौधरी, लोटन बाबुराव चौधरी यांच्यासह इतर समाजबांधवांची उपस्थिती होती.

तिळवण तेली समाजाचे मंगल कार्यालय उभारणे हा केवळ इमारत बांधण्याचा उपक्रम नसून समाजाची एकजूट, संस्कृती आणि पुढील पिढ्यांसाठी उपयुक्त केंद्र उभारण्याचा संकल्प आहे. या संकल्पाला आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही समाजबांधवाने दिलेला हातभार निश्चितच मोलाचा ठरत आहे.

अल्प उत्पन्न असले तरी मोठे मन आणि समाजासाठी योगदान देण्याची भावना यातूनच खऱ्या समाजसेवेचा आदर्श निर्माण होतो. समाजासाठी दिलेला प्रत्येक रुपया अमूल्य असतो, याचे प्रेरणादायी उदाहरण भिका कोंडू चौधरी यांच्या देणगीतून पाहायला मिळाले.

# सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध

दैनिक इनशॉट जळगाव
जळगाव । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्रशासन नेहमीच सफाई कर्मचाऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असून त्यांच्या विविध प्रलंबित मागण्या व समस्यांचे नियमानुसार निराकरण करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर स्वतंत्रपणे लक्ष केंद्रित करून आवश्यक त्या बाबींचा कृती आराखडा तयार करून टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी दिले.

राज्य सफाई कामगार आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान हे मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी जळगाव जिल्हा दौऱ्यावर आले होते. त्यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषदेत सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांच्यासह उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत बोढरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सचिन भायेकर, आयोगाचे विशेष कार्यकारी अधिकारी राजेश सोनवणे तसेच जिल्हा परिषदेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत सफाई कर्मचाऱ्यांच्या कालबद्ध पदोन्नती, वर्ग-४ मधून वर्ग-३ मध्ये पदोन्नती, आश्वासित प्रगती योजनेचे लाभ, प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या स्तरावर काम करताना येणाऱ्या



अडचणी, वारसा हक्काने नियुक्ती तसेच इतर विविध सेवा विषयक प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी राज्य सफाई कामगार आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन प्रलंबित प्रकरणांवर नियमोचित व तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तसेच कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काचे लाभ वेळेत मिळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या कामाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांच्या सेवा विषयक प्रश्नांचे नियमानुसार निराकरण करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन सकारात्मक असून, प्रलंबित मागण्यांचा आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे स्पष्ट केले. ङ्गङ्गसफाई कर्मचारी हे ग्रामीण भागातील स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक आहेत. त्यांच्या सेवा विषयक अडचणींचे निराकरण करण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही प्राधान्याने केली जाईल,ङ्ख असेही मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी यावेळी सांगितले. बैठकीत संबंधित विभागांचे अधिकारी तसेच सफाई कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# कासोदा पोलिसांची मध्यप्रदेशात धडक; २३ शेळ्या-बोकड चोरीचा पर्दाफाश, दोघे जेरबंद

दैनिक इनशॉट जळगाव
जळगाव । प्रतिनिधी

कासोदा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शेतातून चोरीस गेलेल्या २३ शेळ्या-बोकड चोरीच्या गुन्ह्याचा पोलिसांनी मध्यप्रदेशात जाऊन छडा लावला आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतले असून, चोरीस गेलेल्या शेळ्या-बोकडांची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेले वाहनही जप्त करण्यात आले आहे.

कासोदा पोलीस ठाण्यात फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ३ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी साडेसात वाजेपासून ४ सप्टेंबर रोजी सकाळी सहा वाजेपर्यंत कासोदा परिसरातील त्यांच्या शेतातील पत्री शेडमधून १८ लहान-मोठ्या शेळ्या आणि ५ लहान-मोठे बोकड, अशी एकूण २३ जनावरे अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली होती. या प्रकरणी कासोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन जळगावचे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी कासोदा पोलिसांना गुन्ह्याचा सखोल तपास करून आरोपींचा



शोध घेण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यानुसार कासोदा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्रीकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली तपास पथक तयार करण्यात आले.

तांत्रिक तपास तसेच प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांना चोरीचा धागा मध्यप्रदेशातील खरगोन जिल्ह्यातील भगवानपुरा तालुक्यातील बडी गावापर्यंत मिळाला. त्यानंतर पोलिसांनी तेथे जाऊन संशयित आरोपींचा शोध घेतला. या कारवाईत अजय राजू चौहान (रा. साईखेडी, ता. भगवानपुरा, जि. खरगोन, मध्यप्रदेश) आणि सोहन विश्राम ब्राम्हणे (रा. बडी, ता. भगवानपुरा, जि. खरगोन, मध्यप्रदेश) या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले.पोलिसांनी आरोपींकडे चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे प्रेस नोटमध्ये नमूद करण्यात आले आहे. तसेच चोरीस गेलेल्या शेळ्या-बोकडांची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेले वाहन त्यांच्या ताब्यातून जप्त करण्यात आले आहे.

या गुन्ह्यात आणखी काही आरोपींचा सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. त्यामुळे या प्रकरणातील इतर आरोपींचा तसेच चोरीस गेलेल्या उर्वरित मुद्देमालाचा शोध घेण्यासाठी पोलिसांची कारवाई सुरू आहे.या उल्लेखनीय कारवाईस पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, चाळीसगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कासोदा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्रीकांत पाटील तसेच त्यांच्या पथकाने कामगिरी बजावली. शेळ्या-बोकड चोरीसारख्या गुन्ह्यांचा तपास करताना तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे थेट मध्यप्रदेश गाठून आरोपींना ताब्यात घेतल्याने कासोदा पोलिसांच्या या कारवाईचे विशेष कौतुक होत आहे.

# सारजाई कुडे व बालकवी विद्यालयात हिंदी दिवस साजरा



दैनिक इनशॉट जळगाव
धरणगाव । प्रतिनिधी

येथील सारजाई दामोदर कुडे व बालकवी ठोंबरे विद्यालयात १४ सप्टेंबर रोजी हिंदी ग्रंथांचे व भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून हिंदी दिवस साजरा करण्यात आला.

शाळेतील उपशिक्षक श्रीयुत ए डी पाटील सर यांनी हिंदी दिवसाचे महत्त्व व हिंदी दिवसाबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. विद्यार्थिनींनी सुबक फलक लेखन केले.याप्रसंगी शाळेतील मुख्याध्यापक श्री व्ही बी पाटील सर,मुख्याध्यापक एस एस पाटील सर, पर्यवेक्षक डी आर चव्हाण सर तसेच हिंदी शिकवणारे सर्व शिक्षक बंधू भगिनी व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रमुख सागर पाटील सर तसेच समितीतील सर्व सदस्य यांनी परिश्रम घेतले.

# रावेरात केळी उत्पादक शेतकऱ्यांचे धरणे आंदोलनाला सुरुवात

दैनिक इनशॉट जळगाव
रावेर । प्रतिनिधी

येथे केळी उत्पादक शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन तहसील कार्यालयासमोर सुनिल कोंडे यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आले होते.

यावेळी तालुकाभरातील केळी उत्पादक तथा विविध राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी या धरणे आंदोलनाला पाठिंबा देत नुकसान भरपाई व पिक विम्याची रक्कम तात्काळ मिळण्यासाठी पाठिंबा दर्शविला.

गेल्या जून महिन्यात ०१ जून,०४ जून व ०६ जून रोजी झालेल्या चक्रीवादळामुळे केळी उत्पादकांचे अतोनात नुकसान झाले होते. त्यावेळी पंचनामे करण्यात आल्यानंतर यामध्ये सरकारी मदत मिळेल अशी आशा शेतकऱ्यांना लागून होती.मात्र ०३ महिने उलटल्यावरही त्याबाबत कुठलाही शासन निर्णय होत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये कमालीची नाराजी आहे.

यासोबतच पीक विम्याचे मंजूर महसूल मंडळ अजूनही जाहीर केले नसून या सोबतच १४ हजार शेतकऱ्यांच्या पिकविमा मंजूर क्षेत्रात कमी क्षेत्र दाखवलेले असल्याने त्या संदर्भातील ही कुठलीही दुरुस्तीची माहिती पीक विमा कंपनीतर्फे दिली जात नाही. या सर्वांचा रोष म्हणून या सर्वांची त्रुटी दूर करून तात्काळ खात्यात शेतकऱ्यांच्या खात्यात पेमेंट मिळण्यासाठी रावेर येथे तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन कर यात आले.यावेळी तहसीलदार संजय तायडे, तालुका कृषी अधिकारी भाऊसाहेब वाळके, पिक विमा तालुका कंपनी प्रतिनिधी मनोहर पाटील, वैभव पाटील, भगवान पाटील यांनी आंदोलनस्थळी



भेट देत पिक विमा कंपनीचे विभागीय प्रमुख श्री सोमेश देशमुख यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून दिली त्यांनी ३० सप्टेंबरपर्यंत सर्व अडचणी दूर होतील असे आश्वस्त केल्यानंतर धरणे आंदोलन स्थगित करण्यात आले.

यावेळी आंदोलनास काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड.धनंजय चौधरी, शिवसेना जिल्हाप्रमुख योगीराज पाटील, माऊली हॉस्पिटलचे डॉ.संदीप पाटील, सी एस पाटील, शेतकरी संघटनेचे मधुकर पाटील, सामाजिक कार्यकर्ते सुरेश चिंधू पाटील, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वाय एस महाजन,माजी तालुकाध्यक्ष डॉ राजेंद्र पाटील,राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष किशोर पाटील,डॉ सुरेश पाटील,बाजार समिती संचालक सोपान पाटील, गणेश महाजन, राजेंद्र चौधरी, माजी पंचायत समिती सदस्य दिपक पाटील,निंभोरा माजी सरपंच डिगंबर चौधरी,गुणवंत भंगाळे,सुधीर मोरे,विवेक बोंडे, गिरीश नेहेते, योगेश कोळंबे, विष्णू भिरुड,सतीश पाटील,समाधान सावळे,दीपक महाजन,मोहन कचरे, गोपाळ भिरुड ,राकेश बऱ्हाटे, कन्हैया भारंबे, शेख नाजीम,रफिक शेठ, प्रफुल्ल बोंडे, किरण गाजरे, संजय गाजरे, राहुल टोके, भूषण महाजन, स्वप्नील गारसे, विनोद पाटील, प्रशांत बोरोले,ललित पाटील,उमाकांत महाजन,ललित भंगाळे, ॲड. जे जी पाटील,राजेंद्र धनगर,पंकज पाटील,प्रकाश पाटील,राकेश घोरपडे,मोहन बोंडे,राजेंद्र पाटील यांसह अन्य केळी उत्पादकांनी पाठिंबा दर्शविला.

cmyk

# गणरायाच्या साक्षीने सीड लायब्ररीचा श्रीगणेशा

## बीज दानपेटीतून हरित भविष्याची पेरणी

**दैनिक इनशॉट जळगाव**
**मेहरूण । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत मेहरूण येथील श्री संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात गणेशोत्सवाच्या निमित्ताने आजपासून सीड लायब्ररी या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. गणरायाच्या आगमनासोबतच विद्यार्थ्यांमध्ये बीजसंवर्धन, वृक्षसंवर्धन आणि जैवविविधतेविषयी जागरूकता निर्माण करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.



या उपक्रमांतर्गत शाळेत बीज दानपेटीफठेवण्यात आली आहे. पालक, विद्यार्थी, शिक्षक आणि पर्यावरणप्रेमी नागरिकांनी आपल्या घरातील विविध झाडांच्या बिया शाळेत दान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आंबा, जांभूळ, चिंच, सीताफळ, बेल, वड, पिंपळ, कडुनिंब, गुलमोहर, आपटा आदी स्थानिक वृक्षांच्या बियांचे संकलन करून त्यांची विद्यार्थ्यांकडून वर्गवारी, नोंदणी, जतन व संवर्धन केले जाणार आहे. संकलित बियांपासून पुढील काळात रोपे तयार करून त्यांचे वृक्षारोपण केले जाणार असून विद्यार्थ्यांना ङ्गबीज ते वृक्षफ हा संपूर्ण प्रवास प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून ङ्गङ्गगणरायाला एक बीज अर्पण, भविष्यासाठी एक वृक्ष संकल्पफ्फ हा पर्यावरणपूरक संदेश देण्यात येत आहे. एक बीज दान करा उद्याचे एक झाड घडवा!फ्फ या आवाहनाला प्रतिसाद देत पालकांनी आपल्या घरातील उपलब्ध बिया शाळेच्या बीज दानपेटीत जमा करून या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.

> या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम, पर्यावरणीय जबाबदारी, जैवविविधता संवर्धन आणि वृक्षसंवर्धनाचे संस्कार रुजण्यास मदत होणार आहे.
>
> **–श्री. मुकेश सुरेश नाईक, मुख्याध्यापक**

# अमळनेर–चोपडा तालुक्यात १७ सप्टेंबरला महसूल लोक अदालत

**दैनिक इनशॉट जळगाव**
**चोपडा । प्रतिनिधी**

महसूल प्रशासनातील विविध अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली महसुली दावे व अपिले तडजोडीने आणि परस्पर संमतीने निकाली काढण्यासाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार ङ्गमहात्मा ज्योतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानफ राबविण्यात येत आहे. अमळनेर व चोपडा तालुक्यातील प्रलंबित महसुली प्रकरणांसाठी हे अभियान १७ सप्टेंबर २०२६ तसेच ६ जानेवारी २०२७ रोजी आयोजित करण्यात आले आहे.अमळनेर येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत लोक अदालत घेण्यात येणार आहे. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार तसेच मंडळ अधिकारी यांच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या विविध प्रकारच्या महसुली दावे व अपिलांचा या अभियानात समावेश करण्यात आला आहे. दोन्ही पक्षकारांच्या परस्पर संमतीने व तडजोडीने प्रकरणांचा कायमस्वरूपी निपटारा करून पक्षकारांना जलद न्याय मिळवून देणे, तसेच महसूल प्रशासनावरील प्रलंबित प्रकरणांचा ताण कमी करणे हा अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.



प्रलंबित महसुली प्रकरणातील दोन्ही पक्षकारांनी किंवा त्यांच्या वकिलांमार्फत शासन निर्णयासोबतच्या ङ्गप्रपत्र–अफ मधील नमुन्यात तडजोडीसाठी अर्ज संबंधित अर्धन्यायिक न्यायालयात सादर करावा. लोक अदालतीच्या निश्चित दिवशी दोन्ही पक्षांच्या सहमतीने प्रकरणावर अंतिम आदेश पारित करून प्रकरण कायमस्वरूपी निकाली काढण्यात येणार आहे.त्यामुळे अमळनेर व चोपडा तालुक्यातील तसेच उपविभागीय अधिकारी, अमळनेर भाग, अमळनेर यांच्या स्तरावर अर्धन्यायिक प्रकरणे प्रलंबित असलेल्या पक्षकारांनी या अभियानात जास्तीत जास्त सहभाग घ्यावा आणि तडजोडीसाठी आवश्यक अर्ज सादर करून आपले प्रकरण निकाली काढण्याची संधी घ्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांनी केले आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी मिझोराममधील क्रीडा परिसंस्थेचा घेतला आढावा

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

केंद्रीय युवा कार्य व क्रीडा राज्यमंत्री श्रीमती रक्षा खडसे यांनी आज ऐझॉल येथील भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या केंद्राला भेट देत मिझोराममधील क्रीडा पायाभूत सुविधा, खेळाडूंचे प्रशिक्षण आणि क्रीडा विकासाचा आढावा घेतला. यावेळी मिझोरामचे क्रीडा व युवा सेवा मंत्री पु. लालंघिंगलोवा हमार यांनी श्रीमती खडसे यांचे स्वागत केले. दोन्ही नेत्यांनी मिझोराममधील क्रीडा विकासासाठी केंद्र व राज्य सरकारमधील समन्वय अधिक मजबूत करण्याबाबत चर्चा केली.



श्रीमती खडसे यांनी भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या केंद्रातील खेळाडू, प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या प्रशिक्षणाचा अनुभव, स्पर्धांमधील सहभाग आणि भविष्यातील आकांक्षा जाणून घेतल्या. यावेळी भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे सहाय्यक संचालक श्री. शिवम यादव उपस्थित होते. ईशान्य भारतातील युवा खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण, क्रीडा विज्ञान, पुनर्वसन, पोषण, स्पर्धांचा अनुभव आणि राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देण्यावर श्रीमती खडसे यांनी भर दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात क्रीडा संस्कृती अधिक व्यापक करण्यासाठी आणि तळागाळातील प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी खेलो इंडिया उपक्रमाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. मिझोरामसह ईशान्य भारतातील क्रीडा प्रतिभेला या माध्यमातून अधिक सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देण्यावर श्रीमती खडसे यांनी भर दिला. मिझोराममध्ये ऐझॉल येथील भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या प्रशिक्षण केंद्रात खेलो इंडिया अंतर्गत सिंथेटिक हॉकी टर्फ आणि प्रकाशयोजना उभारण्याचा प्रकल्पही क्रीडा पायाभूत सुविधा मजबूत करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे.

# उद्दिष्टकेंद्रीत नियोजनातून सेवा संकल्प अभियान यशस्वीपणे राबवा – जिल्हाधिकारी

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

सेवा संकल्प अभियानात लोककल्याणकारी योजनांची माहिती सर्व सामान्यान पर्यंत पोहचविण्यासोबतच महत्वाच्या उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करून सेवा संकल्प अभियान यशस्वीपणे राबविण्याच्या सुचना जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दिल्या.

जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या ङ्गसेवा संकल्प अभियानाफ्च्या पूर्वतयारी संदर्भात जिल्हास्तरीय आढावा बैठक जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली, यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर, उपविभागीय अधिकारी योगेश कुमार मीना, अपर जिल्हाधिकारी श्रीमंत हारकर, विविध विभागांचे विभाग प्रमुख प्रत्यक्ष तर सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. घुगे पुढे म्हणाले, या अभियानाची जिल्ह्यात प्रभावीपणे अमंलबजावणी करण्यासाठी प्रत्येक विभागाने आवश्यक नियोजन करावे आणि विशेष नाविन्यपूर्ण उपक्रम तालुका स्तरावर व शहरात प्रभावीपणे राबवावेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने तसेच त्यांच्या कार्यकाळातील ङ्गसेवा परमोधर्मफ या भावनेतून सामान्य नागरिकांपर्यंत विविध शासकीय सेवा पोहोचविण्याच्या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येणार आहे. अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना विविध सेवा, योजनांची माहिती आणि त्यांचा लाभ अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.



अभियानांतर्गत सेवा सेतूफ उपक्रमाद्वारे जिल्ह्यातील नागरिकांना विविध सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यात प्रलंबित फेरफार नोंदीचा निपटारा करणे / जिवंत सातबारा मोहीम, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतंर्गत सिंचन विहिरी करिता अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करणे, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद वाटप करणे, दिव्यांग प्रमाणपत्र देणे, मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते उपलब्ध करणे यासारखे उपक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा आणि तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी आवश्यक नियोजन करून प्रभावी अंमलबजावणी करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी घुगे यांनी यावेळी दिल्या.

इनोव्हेशन चॅलेंजफ अंतर्गत जिल्ह्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यावसायिक, कॉर्पोरेटर्स व ग्रामीण भागातील नवीन सोल्युशन्स विकसित करणाऱ्यांना जोडण्यात येणार आहे. ङ्गसेवा माझे योगदानफ अंतर्गत स्थानिक गरजेनुसार रक्तदान, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी, महिलांचे आरोग्य व स्वच्छता, पोषण आणि ॲनिमियाबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करावे. शासकीय व खाजगी शाळांमध्ये ङ्गविकसित भारतफ संकल्पनेवर चित्रकला तसेच ङ्गमुलांच्या स्वप्नातील भारतफ व ङ्गविकसित भारत–२०४७फ या विषयांवर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार असून विजेत्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. ङ्गविकसित भारत संकल्प यात्राफ अंतर्गत ङ्गविकसित भारत–२०४७फ्ची सेवा ज्योत यात्रा बाईक रॅली काढून माहिती देण्यात यावी. सर्व अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांना आमंत्रित करून महिलांना आरोग्य व पोषण संदर्भातील योजनांची माहिती संबधित विभागामार्फत देण्यात यावी, असे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर यांनी या अभियानासंदर्भात जिल्हा परिषदेमार्फत तालूका व ग्राम पंचायत स्तरावर विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार असल्याची माहिती दिली.